ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी पर्यटनाची भूमिका

**प्रा. डॉ. गोरक्षनाथ सानप[1], पायल काशिनाथ लहामगे[2]**

[1] *अर्थशास्त्र विभाग प्रमुख,*
*संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य व ब. ना. सारडा विज्ञान महाविदयालय (स्वायत्त) संगमनेर*
*संशोधक विद्यार्थीनी,*
*संगमनेर नगरपलिका कला दा. ज. मालपाणी वाणिज्य व ब. ना. सारडा विज्ञान महाविदयालय (स्वायत्त), संगमनेर*

***Corresponding Author:** प्रा. डॉ. गोरक्षनाथ सानप*

**DOI - 10.5281/zenodo.14885674**

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून कृषी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचे क्षेत्र आहे. कृषी हा भारतातील लोकांचा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात, रोजगारात, औद्योगिक विकास, विदेशी व्यापार आणि एकंदरीतच देशाच्या अर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे अर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे स्थान महत्वाचे आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे (Agriculture is the axle of Indian economy) असे म्हटले जाते, यावरूनच आपल्याला कृषी क्षेत्रातचे भारतीय अर्थव्यवस्थेतील असणारे महत्त्व लक्षात येते.

कृषी पर्यटन कधी सुरु झाले याचे निश्चित वर्ष सांगणे थोडे कठीण आहे, कारण कृषी पर्यटन ही एक प्राचीन संकल्पना आहे म्हणून शेती करु लागला तेव्हापासून पाहुणचार करण्याची आणि आपल्या जीवनशैलीची ओळख करुन देण्याची प्रथा होती.

आधुनिक स्वरूपात भारतात कृषी पर्यटनाला व्यवसायिक स्वरूप 1979-80 साली देण्यात आले. कृषी पर्यटन ही पर्यटनातील वेगळी संकल्पना आहे. विशेषत शेती संबंधीत ही संकल्पना असल्यामुळे भारतासारख्या अनेक शेती प्रधान देशात कृषी पर्यटनाला जास्त महत्व आहे. जगभर पर्यटन हा व्यवसाय वेगाने वाढत आहे. कृषी पर्यटनाची जगभरात वेगवेगळ्या देशात वेगवेगळी आहे. कृषी पर्यटनातून गावाचा राज्याचा आणि देशाचा विकास होत असतो.

शासनाने दि : 4/5/2016 च्या शासन निर्णयानुसार नवे पर्यटन धोरण जाहीर केले असून या धोरणाअंतर्गत पर्यटन क्षेत्रामध्ये वार्षिक 10 टक्के उत्पन्न आणि राज्याच्या सकल उत्पन्नात पर्यटन क्षेत्रात 15 टक्के वाटा प्राप्त करण्याचे तसेच या क्षेत्रात सन 2025 पर्यंत 10 दशलक्ष रोजगार निर्मिती करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

कृषी पर्यटन म्हणजे शेतात आणि गावात फेरफटका मारणे, आपल्या संस्कृतीची ओळख करून घेणे, नैसर्गिक आनंद घेणे. शहरी जीवनशैलीचा कंटाळा आलेल्या लोकांनी दोन दिवस शेतकऱ्यांच्या शहरी लोकांचा संशुल्क पाहुणचार आदरतिथ्य करणे म्हणजे कृषी पर्यटन होय. कृषी पर्यटन हा नवीन उपक्रम आहे. ‘ कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास ’ या ब्रीद वाक्याला साजेसे कृषी पर्यटन क्षेत्र आहे. शेती व्यवसाला जोड व्यवसायाची साथ देऊन उत्पदनांत भर घालता येणारा प्रकल्प म्हणजे ‘कृषी पर्यटन ’ होय.

कृषी पर्यटन म्हणजे प्रत्यक्षात शेती कशी केली जाते शेती कशी पीकवतात, शेतात कोण कोणती पीके कधी येतात, शेतात शेतीची लागवड कधी आणि कशी केले जाते. एकंदरीत ग्रामीण भागातील शेती विषयक सर्व उपकरणे आणि कार्य जे शेतात चालता आणि ते

बहुतांश शहरी लोकांना वाचून किवा ऐकून माहिती असते पण प्रत्यक्षात शेतात जाऊन ते पाहणे अनुभवणे स्वत : शेतात काम करणे आणि ख-या अर्थाने अनुभव घेऊन. ग्रामीण जीवन जगण्याचा पर्याय कृषी प्रत्यक्ष स्व अनुभव घेणे म्हणजे ‘ कृषी पर्यटन ’ होय.

**संशोधनाचे उद्दिष्ट :**

1) कृषी पर्यटनाच्या काळानुसार झालेला बदल अभ्यासणे.

2) कृषी पर्यटनासाठी शासनाकडून मिळणारे लाभ अभ्यासणे.

3) कृषी पर्यटनाच्या शेतकऱ्यासाठी किती फायदा होतो ते तपासणे.

4) कृषी पर्यटन केंद्राचे स्वरूप, विकास व महत्व यांचा अभ्यास करणे.

5) कृषी पर्यटनासाठी विविध शासकीय योजना व धोरणांचा आढावा घेणे.

**कृषी पर्यटनांची आवश्यकता:**

पर्यटन म्हणजे पैसा असणाऱ्याची मौज हा समज आता मागे पडला आहे. सिमेंटच्या जंगलात आणि वाहनाच्या धुराड्यामध्ये वावरणाऱ्या लोकांना रोजच्या धकाधकीच्या जीवनापासून मुक्त, शांत, निवांत जीवन जगण्यासाठी आणि ग्रामीण जीवनाची अप्रूप असणाऱ्यासाठी कृषी पर्यटन हा उत्तम मार्ग आहे. त्यामुळे शहरी लोकांना कृषी पर्यटनाकडे ओढ वाढत आहे. तेव्हा लोकांची मागणी लक्षात घेवून उत्तम कृषी पर्यटन केंद्र उभारणे आवश्यक आहे.

चांगल्या कृवी पर्यटन केंद्रासाठी 2-5 एकर शेतजमीन असावी. या ठिकाणी एक बाब लक्षात ठेवावी की या जमिनीवर प्रत्यक्ष शेती करावयांची नाही तर शेती सादृश्य परिस्थिती निर्माण करावयाची आहे उत्तम कृषी पर्यटनासाठी पर्यटकांच्या निवासाच्या सोयीसाठी किमान सहा खोल्या असाव्यात व सभामंडपासाठी पर्यटकांच्या निवासाच्या सोयीसाठी किमान सहा खोल्या निवासाच्या असाव्यात व सभामंडपासाठी एक मोठी खोली असावी.शेतजमीन उच्चसखल किवा डोगराळ असेल तरी सुद्धा त्याचा कल्पकतेने विचार केला जाऊ शकतो. उत्तम कृषी कौलारू घर बैलगाडी, धबधबा किवा ओहोळ, झरा,भरपूर झाडे, गावरान खादय पदार्थाची सोय इत्यादी बाबी असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर कृषी पर्यटनाचा विकास होण्यासाठी कृषी पर्यटनाच्या आसपासच्या परिसरात पुढील पायाभूत सुविधाची आवश्यकता असते.

1) वाहतुकीच्या सोयी सुविधा

2) निवास व भोजन सुविधा

3) मनोरजव सेवा

4) संपर्क सेवा

5) चलन विनिमय

6) इतर सुविधा

- प्रमाण परिसर विकास
- पाण्याची उपलब्धता
- मार्गदर्शक सुविधा

**कृषी पर्यटनातून रोजगाराच्या संधी:**

कृषी पर्यटनातून तरुनाना रोजगार निर्माण होणे कृषी पर्यटनातून ग्रामविकास आणि ग्रामविकामातून महाराष्ट्राचा विकास या संकल्पनेतून कृषी पर्यटनाचा विकास करता येतो. कृषी पर्यटनाच्या मध्यमातून रोजगार निर्मिती होण्यास वाव आहे. गावाचा इतिहास, संस्कृती वनस्पती या विषयी माहिती हे तरुब पर्यटकांना देऊ शकतात. यातून यातून गावाची संस्कृती जपली जाते आणि, पर्यटन केद्राला कमीत कमी पाच, जास्तीतजास्त शंभर लोकांनाही रोजगार मिळतो.

शेतकऱ्यांना कृषी पर्यटन धोरणाअंतर्गत नोदणी केल्यास शेतीपूरक व्यवसाय व रोजगाराचे नवीन साधन उपलब्ध होणार आहे. कृषी पर्यटन केंद्र

उभारणीसाठी मनुष्यबळ लागते. पर्यटकांचे नियोजन, मर्गदर्शन, स्वयपाकासाठी, माठी काम, लाँड्री ट्रेकिंग, बेटिंग, शिवार फेरी, बाजार खरेदी, ऑनलाईन मार्केटिंग जहिराती व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणात कामगार, लागतात. बैलगाडी ट्रक्टर, उंट, बिहरीत पोहणे यासाठी प्रशिक्षकाची गरज असते. यामुळे तरुनाना रोजगार निर्माण होतो. ग्रामीण भागात महिला पुरणपोळी, भाकरी, विविध चटणी बनवतात या कौशल्याचा उपयोग करून मोठ्याप्रमाणात कृषी केंद्रासाठी रोजगार निर्माण करू शकतात. तसेच ग्रामीण भागातील पापड, लोणच स्थनिक खादयपदार्थ तयार करून कृषी पर्यटन केंद्रावर विक्रीसाठी ठेवता येतात स्थानिक कलाकार हस्तकला, कलाकृती, दुर्मिळ वस्तू इ दाखवण्यासाठी ही मनुष्यबळची व्यवसाय कृषी पर्यटन हा रोजगार मिळून देण्याऱ्या व्यवसाय आहे.

**कृषी पर्यटन केंद्रास शासनाकडून मिळणारे लाभ:**

1) कृषी पर्यटन केंद्रास पर्यटन विभागाकडून नोंदणी प्रमाणपत्र मिळेल.
2) कृषी पर्यटन केंद्र मालकास नोंदणी प्रमाणपत्राच्या आधारे बैंक कर्ज प्राप्त करता येऊ शकेल.
3) नोंदणीकृत कृषी पर्यटन केंद्रास पर्यटन धोरण 2016 मधील प्रोत्साहनांचा उदा. वस्तु व सेवा कर, विद्युत शुल्क (मुद्रांक शुल्क सवलत वगळता) इ. चा लाभ घेता येईल.
4) जलसंधारण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या शेततळे योजनेकरिता कृषी पर्यटन केंद्रास प्राधान्य देण्यात येईल.
5) नोंदणीकृत कृषी पर्यटन केंद्रास राज्य व केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ग्रीन हाऊस, फळबाग, भाजीपाला लागवड यासारख्या योजनांचे फायदे घेता येतील.
6) कृषी पर्यटन धोरणांतर्गत ज्या ठिकाणी घरगुती स्वयंपाकगृह वापरले जाईल त्या ठिकाणी सदर केंद्रांना निवास व न्याहारी योजनेच्या धर्तीवर घरगुती गॅस जोडणी वापरता येईल.
7) कृषी पर्यटन केंद्रास वीज आकारणी घरगुती दराप्रमाणे आकारण्याबाबत विचार करण्यात येतो.

**कृषी पर्यटन फायदे:**

1) शहरी लोकांना ग्रामीण जीवनशैलीचा अनुभव देते.
2) ग्रामीण भागातील लोकांना अर्थिक उत्पन्न मिळते.
3) ग्रामीण भागातील सस्कृती आणि परंपरा जनन होते.
4) पर्यावरण संवर्धन होते.
5) शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांमध्ये संवाद वाढतो.

**सारांश:**

भारतातील 70 टक्के लोकसंख्या खेड्यामध्य राहते आणि त्याची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. वाढती लोकसंख्या, अधुनिक जीवनशैली आवि खाण्याच्या सवयी लक्षात घेता, त्यांनी शेतीव्यतिरिक्त इतर व्यवसाय स्वीकारने आवश्यक आहे जेणेकरून त्यांचे जीवनमान मजबूत होईल भारतातील शेती शेती ही व्यवसायापेक्षा संस्कृती आहे. पर्यटन हा भारताचा मुख्य उद्योग आणि उत्पन्नाचा स्रोत आहे. जर हा उद्योग कृषी व्यवसायाशी जोडला गेला तर कृषी पर्यटन शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त उत्पन्नाचे साधन बनू शकते. शेतकरी ग्रामीण समुदाय आगि टूर ऑपरेटर इत्यादी सर्वांना फायदा होतो.

कृषी पर्याटन म्हणजे शहरातील व्यक्तीना ग्रामीण भागातील शेती जीवन शैलीचा अनुभव घेण्याची संधी

देणारा एक प्रकारचा पर्यटन व्यवसाय आहे. यात शहरी लोक शेतात राहुन शेतीचा अनुभव घेतात.

**संदर्भ सूची:**

1) कृषी पर्यटन en.mwikipedia.org.

2)Agro-Tourism-GR.marathiMaharashtraurism.gov.in

3) कृषी पर्यटन व्यवसाय महिती www.webshodhinmarthi.in

4) पुरोहित वसुधा (2016) ‘‘कृषी अर्थशास्त्र’’ शशिकांत पिपळपुरे, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद